नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०९/२०२६ (बुधवार )**

........................................................................................................

## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांची प्रतिबंधात्मक कारवाई; कलम ९३ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये ५१ अंतिम व ०८ अंतरिम बंधपत्रे

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व निर्भय वातावरणात पार पडावा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांकडून सतत प्रतिबंधात्मक उपाययोजनांना करण्यात येत आहे.

**याच पार्श्वभुमीवर दिनांक ०२/०९/२०२६ रोजी काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल,नरखेड आणि जलालखेडा येथील आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमातील कलम ९३ अन्वये अंतिम बंधपत्राची कार्यवाही करण्यासाठी येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यवाहीदरम्यान उपविभागीय दंडाधिकारी, काटोल यांच्याकडून एकूण ५१ आरोपींकडुन अंतिम बंधपत्रे तसेच ०८ आरोपींकडुन अंतरिम बंधपत्रे ५०,०००/— रूपये प्रमाणे घेण्यात आले आहे. आगामी सणो—उत्सव जन्माष्टमी, पोळा, गणेशोत्सव आणि नवरात्रीच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच अवैध दारू विक्रीस आळा बसावा, या उद्देशाने काटोल उपविभागात विशेष मोहीम राबवण्यात आली.**

तलुका निहाय अंतिम बंधपत्रांची संख्या खालीलप्रमाणे आहे.
काटोल — एकुण २९ बंधपत्रे
नरखेड — एकुण १२ बंधपत्रे
जलालखेडा — एकुण १० बंधपत्रे असे एकुण ५१ बंधपत्रे घेण्यात आले आहे.

आगामी सणोत्सवादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच शांतता व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी संभाव्य व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. नागपूर ग्रामीण पोलीसांकडून सणोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.तसेच  यापुढे अवैधरित्या दारूविक्री ,निर्मिती,वाहतुक केल्यास त्यांचेवर ५०,०००/— रूपयांपर्यंतचा दंड आकारण्यात येणार आहे.

सदर वेळी श्री पियुष चिवंडे, उपविभागीय अधिकारी काटोल ,श्री पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी,काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री रणजीत शिरसाठ, प्रभारी अधिकारी, काटोल, सहा पोलीस निरीक्षक विनोद जांभळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती मंगला मोकाशे, प्रभारी अधिकारी, नरखेड हे हजर होते.





## २४ तासात घरफोडीचा गुन्हा उघड,संपुर्ण मुद्‌देमाल जप्त
## मौदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री.शशांत एन.एम. सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०२/०९/२०२६ रोजी मौदा पोलीसांनी २४ तासात घरफोडीच्या गुन्हा उघड करून एकुण ७०,३००/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त करत एका आरोपीला अटक केले आहे.**

पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत दिनांक ३१/०८/२०२६ रोजी फिर्यादी नामे विशाल रामकृष्ण वासनिक, राह. माथणी, ता. मौदा यांनी पोलीस ठाणे, मौदा येथे येवुन रिपोर्ट दिली की, दि. ३०/०८/२०२६ रोजीचे रात्री दरम्याण घरी कोणीही नसतांना कोणीतरी अज्ञात आरोपीने घराचे दरावाजाचे कुलुप तोडुन घरातील आलमारातील सोन्याचे दागीणे २१ ग्रॅम कि. ७०,३००/—रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेले आहे. असे फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३०५ (अ), ३३१ (४) भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

मौदा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकार आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यात माथणी येथील आरोपी आशय

धर्मदास वासनिक, वय १९ वर्षे, व त्याचा साथीदार विधीसंघर्षग्रस्त बालकाने सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. आरोपी आणि विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीने २१ ग्रॅम सोन्याचा ऐवज किंमती ७०,३००/— रूपयांचा संपुर्ण मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्हयातील **आरोपी आरोपी आशय धर्मदास वासनिक, वय १९ वर्षे, याला अटक करण्यात आले.**



# दुकानाचे शटर फोडून झालेल्या चोरीचा गुन्हा उघड
# उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड :—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०२/०९/२०२६ रोजी उमरेड पोलीसांनी दुकानफोडीचा एक गुन्हा उघड केला आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत तक्रारदार अनिलकुमार टिकमदास गोविंदानी यांनी तक्रार दिली की, त्यांचे अनिल ट्रेडर्स नावाचे किराणा दुकाण ईतवारी पेठ येथील मुख्य बाजापेठेत असुन दिनांक ०५/०७/२०२६ रोजी च्या रात्री २१/०० वा. पासुन ते दिनांक ०६/०७/२०२६ चे पहाटे च्या रात्री ०४/४५ वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने दुकाणाचे शटर तोडून दुकानातील नगदी आणि चांदीचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम ३३१ (४), ३०५ (अ) भा.न्या.सं. अन्वये अज्ञात आरोपी विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.**

**सदर गुन्ह्याच्या तपास दरम्यान तांत्रीक पुरावा व गोपनीय माहीतीच्या आधारे गुन्ह्यामध्ये विधीसंघर्षग्रस्त बालकाने त्याच्या साथीदारांसह गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. आज दिनांक ०२/०९/२०२६ रोजी गुन्ह्यात सहभाग असलेल्या एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले. विधीसंघर्षग्रस्त बालकाने त्याच्या साथीदारांसह गुन्हा केल्याची माहीती दिली. त्याच्या कडून त्याच्या हिस्स्याला आलेल्या रकमे पैकी शिल्लक असलेली रोख रक्कम १,८००/— रुपये जप्त करण्यात आले आहे.**



## अंधश्रद्धा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल गुन्ह्याची उकल; आरोपी अटक , कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही :— मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा तसेच श्री. मयंक माधव, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली कुही पोलिसांनी कलम ३(२), महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा तसेच जादूटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम अन्वये दाखल गुन्ह्याचा तपास करून अज्ञात आरोपीचा शोध घेवुन आरोपीस अटक केले आहे.**

पोलीस स्टेशन कुही येथे फिर्यादी प्रशांत बाळू चाचेरकर, वय ३१ वर्षे, रा. साळवा, ता. कुही, जि. नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध पोलीस स्टेशन कुही कलम ३(२), महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा तसेच जादूटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाची हकीकीत अशी आहे की, फिर्यादी यांच्या वडिलांची

साळवा येथील स्मशानभुमीमध्ये अंतिमविधी करण्यात आली. दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी ०९/०० वा. सर्व राख आणण्यासाठी साळवा येथील स्मशानभुमीमध्ये गेले असता राखेवर एक पिवळया रंगाच्या कापडाची बनविलेली बाहुली, लाल पिवळया रंगाचा धागा ठेवलेला दिसला. तसेच एका बॉटलमध्ये द्रव्य पदार्थ काही निंबु व कवळी एक अगरबत्ती ठेवलेले फिर्यादीला दिसले. तसेच तेथेच जवळ असलेल्या शोकसभागृह येथे बसण्याचे जागेवर कपडे, मोजे (सॉक्स), लाल पिवळया रंगाचा धागा, एक जोड बुट, निंबु व कवळी दिसली. तसेच त्याच दिवशी सायंकाळी फिर्यादीच्या घराचे भोवताल चारही बाजुला कापलेले निंबु ठेवलेले दिसले.

**सदर गुन्ह्याचा सखोल तपास करून कुही पोलिसांनी गोपनीय माहिती तसेच तांत्रिक पुराव्यांच्या आधारे अज्ञात आरोपीला निष्पन्न केले. आरोपी नामे रामनरेश नथ्थू विश्वकर्मा, वय ५८ वर्षे, रा. प्रधानमंत्री आवास योजना, क्वार्टर्स नं. ०५, भिलगाव, नागपूर यास दिनांक ०२/०९/२०२६ रोजी ताब्यात घेवुन अटक करण्यात आले. आरोपीकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने कौशल्यपूर्ण पद्धतीने चौकशी केली असता त्याने सदर गुन्हा केल्याबाबत माहीती दिली. आरोपीला दिनांक ०३/०९/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## ०२ गोवंश जनावरांची सुटका, भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०२/०९/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांना भिवापूर — उमरेड मेन रोडवरील भिवापूर एमआयडीसी टी पॉईंट येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक टाटा एस कंपनीची चारचाकी वाहन क्र. एम एच—०४/एच डी—१९२७ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०२ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने

कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक टाटा एस कंपनीची चारचाकी वाहन क्र. एम एच—०४/एच डी—१९२७ किंमती ४,५०,०००/— रूपये आणि ०२ गोवंश जनावरे किंमती ३२,०००/— रूपये असा एकुण किंमती ४,८२,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

**नमुद प्रकरणी एक टाटा एस कंपनीची चारचाकी वाहन क्र. एम एच—०४/एच डी—१९२७ चा चालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम ११(१), (ई), (डी), (एफ), (एच), (के) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम १८४ मोवाका. सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**



## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ४ हजार ६१० रूपयांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०१/०९/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पिरावा भिवापूर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) राजेश रघुनाथ कळांबे, वय ३८ वर्ष, रा. नांद भिवापुर, २) सौरभ शंकर नत्रावरे, वय २१ वर्ष, रा. नांद भिवापुर, ३) आशिष देविदास चौधरी, वय २८ वर्ष, ४) तन्मय सुनील बांगरी, वय २१ वर्ष, ५) शुभम मोतीराम उरकुडे, वय २८ वर्ष, ६) अमीत रमेश बांगरी, वय ३० वर्ष, ७) राहुल बाळकष्ण घरत, वय ३० वर्ष, सर्व रा. नांद भिवापुर ८) अजय सुभाष डडमल, वय २७ वर्ष, ९) नितेश गुलाब गिरडकर, वय २६ वर्ष, १०) नामदेव नारायण गायकवाड, वय ४५ वर्ष, तिन्ही रा. पिराया भिवापुर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ४५६०/—रूपये असा एकुण ४६१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद १० आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०८ गुन्हे नोंद

**दिनांक ०१/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०८ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे सोहेल अब्दुल खान, वय २५ वर्ष, रा. सब एरिया ऑफिस समोर कामठी कॉलनी, खदान नं. ३, ता. पारशिवनी याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे विशाल विश्वनाथ दूरगडे, वय ३१ वर्ष, रा. रोंगा, ता. तुमसर, जि. भंडारा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा** आरोपी अमित राजपुत, रा. तिडगी, ता. कळमेश्वर याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत** आरोपी सुरेश रामाजी कळंबे, वय ४८ वर्ष, रा. भिष्णुर, ता. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत** आरोपी १) मनोहर भिमराव गजभिये, वय ४५ वर्ष, रा. खरसोली, त. नरखेड २) प्रकाश गंगाधर राउत, वय ४१ वर्ष, रा. खरसोली त. नरखेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** आरोपी जितेंद्र बाबुराव शेळके, वय ३५ वर्ष, रा. येनवा काटोल, ता. काटोल, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव अंतर्गत** आरोपी गौरव दादाराव खोरगडे, वय ३४ वर्ष, रा. बहादुरा नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १०८९० मिली देशी दारू, ५० लिटर मोहाफुल दारू, १००० लिटर मोहाफुल रसायन सडवा असा एकुण ५९८४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांवर एन.डी.पी.एस कायदयान्वये ०२ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०१/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन जलालखेडा येथे अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०२ आरोपी यांचेवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत आरोपी १) मनोज नामदेव कळंबे, वय ३९ वर्ष, रा. भिष्णुर ता. नरखेड २) दिलीप किसनाजी कळंबे, वय ३९ वर्ष, रा. जलालखेडा, ता. नरखेड हे भिष्णुर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर